# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ६४४
दिनांक : 21 JUN 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील संस्थास्तरावरील कोटयासाठी सक्षम प्राधिकारी यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीबाबत....

संदर्भ : शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०३,१०४ आणि १०५, दिनांक २४.४.२०१७

राजपत्र क्रमांक १०३,१०४ व १०५ अन्वये अनुक्रमे पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम निर्धारीत करण्यात आलेले आहेत. या प्रवेश नियमावलीतील कलम १३ (ग)मध्ये संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील रिक्त जागांवर प्रवेशासाठी प्रत्येक संस्थेने प्रवेशाचे वेळापत्रक, पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर आणि सक्षम प्राधिकारी यांचे संकेतस्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून अधिसूचित करुन आवेदनपत्र मागविण्याची तरतूद आहे.

यासंदर्भात सर्व तांत्रिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या विनाअनुदानीत संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता वरील तरतूदीनुसार संस्थांच्या जाहिराती सक्षम प्राधिकारी म्हणून मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य आणि संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी तांत्रिकदृष्टया शक्य होणार नाही. मात्र सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. जाहिरातीमध्ये संस्थेने **प्रवेशाचे वेळापत्रक, पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या** नमूद करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

**(चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से)
संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Budage\२०१७-१८\General Correspondence\letter for advertisement on competent authority website.docx